जेव्हा सगळंच
संपून गेलय
असंआपल्याला
वाटतंतीच खरी
वेळ असते नवीन
काही तरी सुरू
करण्याची

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १४ एप्रिल २०२५ | अंक १२३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




## शेतकरी कर्जमाफीवर बच्चू कडू यांच्यानंतर आता राजू शेट्टी आक्रमक, थेट इशारा



### नेत्यांना राज्यात फिरणं मुश्किल करू

**तुमची औकात नव्हती, तुम्हाला जमत नव्हतं, तर आश्वासन का दिलं? असा सवाल यावेळी राजू शेट्टी यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, अजित पवार सांगतात आम्ही आता सातबारा कोरा करू शकत नाही, राज्याची तशी स्थिती नाही. मग महायुतीने खोटं अश्वासन का दिलं, शेतकऱ्यांना का गंडवलं? राज्याची आर्थिक स्थिती बिकट आहे तर, शक्तिपीठ सारखे खर्चिक प्रकल्प महाराष्ट्रावर का लादत आहात? त्यामुळे यापुढे महायुतीच्या नेत्यांना राज्यात फिरणं मुश्किल करू, असं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे**

### नेमकं काय म्हणाले राजू शेट्टी?

स्वाभिमानीचाही असाच निर्णय झालेला आहे, महायुतीने निवडणुकीच्या काळात सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिलं होतं. हमीभावाच्या 20 टक्के अनुदान देण्याची घोषणा केली होती, या दोन्ही घोषणा हवेत विरल्या आहे. शेतकरी आक्रमक झालेला आहे.आणि सध्या आमचीही जनजागृती सुरू आहे. प्रहारने जसं सत्ताधाऱ्यांच्या घरी जाऊन आंदोलन केलं तसं आम्ही महायुतीच्या मंत्र्यांना कार्यक्रमात जाऊन जाब विचारणार आहोत, असा इशारा राजू शेट्टी यांनी यावेळी सरकारला दिला आहे


राज्यात पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा तापला आहे, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीच्या नेत्यांकडून कर्जमाफीचं अश्वासन देण्यात आलं होतं. त्यानंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीची सत्ता आहे. महायुतीला राज्यात प्रचंड बहुमत मिळालं. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट या तीन पक्षांचे राज्यात तब्बल 232 उमेदवार विजयी झाले. तर महाविकास आघाडीला केवळ 50 जागांवरच समाधान मानावलं लागलं. दरम्यान राज्यात आता महायुतीचं सरकार आलं आहे, शेतकऱ्यांच्या नजरा कर्जमाफीकडे लागल्या आहेत. मात्र अजूनही त्याबाबत कोणतीच हालचाल होताना दिसत नाहीये, दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून सातत्यानं सुरू असलेल्या वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये कर्जमाफीवरून संभ्रम निर्माण झाला आहे. याविरोधात आता प्रहार जनशक्ती पक्षानं चांगलीच आक्रमक भूमिका घेतली आहे. बच्चू कडू यांच्या प्रहारच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांच्या घरासमोर जाऊन आंदोलनाला सुरुवात केली आहे. दरम्यान बच्चू कडू यांच्या या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी देखील मोठं वक्तव्य केलं आहे.

## हनुमान जयंती निमित्त महासांगवी येथे रक्तदान शिबिर संपन्न.

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथे हनुमान जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रक्तदात्याने रक्तदान करुण सहभाग नोंदवला. पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथे दर साल हनुमान जयंती उत्सव साजरा केला जातो. येथील हनुमान जागृत देवस्थान असुन पंचक्रोशितील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. या उत्सवाचे अवचित्य साधुन महासांगवी येथील रोटी बँकेचे संचालक व श्री अन्नपुर्णा देवी सेवा भावी संस्थेचे सचिव तथा जिव-जंतु कल्याण बोर्ड भारत



सरकार चे सदस्य सामाजिक कार्यकर्ते संतोष गर्जे व जिल्हा रुग्णालय बीड यांच्या सयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रक्तदात्याने रक्तदान केले या शिबिरासाठी जिल्हा रुग्णालयाचे डॉ. खेडकर आर.एस., डॉ.एस.एम.गायकवाड, डॉ.एन.एस. नवगिरे, डॉ.यु.टी. राऊत यांचा सहभाग होता. शिबिराचे उद्घाटन महासांगवी येथील संत मिराबाई संस्थानचे ह.भ.प. राधाताई महाराज (आईसाहेब) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थिती मध्ये महेंद्र गर्जे (माजी सभापती) आणि मधुकर गर्जे (भा.ज.पा. अध्यक्ष) यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून "जिव्हाळा बेघर निवारा केंद्र" बीड केंद्राचे संचालक राजु वंजारे सर व अभिजित वैद्य यांची उपस्थिती होती. या शिबिरासाठी गोपाळघरे सर, डॉ.प्रताप राख, विनोद गर्जे (पोस्ट मास्टर, पाटोदा), गणेश सानप (ग्रा.पं.सदस्य), सदगुरु गर्जे (माजी सरपंच), ओमप्रकाश गर्जे (माजी सरपंच), सर्जेराव गर्जे (जेष्ठ नागरीक), शिवाजी सानप (कॉन्स्टेबल) व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता : विविध विषयांवर समाजप्रबोधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : लोहा तालुक्यातील धनंज (बु) येथील १३-एप्रिल रोजी अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प.मधुसूदन महाराज कापशीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली.धनंज (बु) येथील अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी गाथा पारायण व संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा ६-एप्रिल ते १३ एप्रिल या दरम्यान आयोजित



करण्यात आला होता. सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर भागवताचार्य हभप पांडुरंग महाराज देशमुख यांच्यासह विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाजप्रबोधन करण्यात आले. या अखंड हरिनाम सप्ताहाची हभप मधुसूदन महाराज कापशीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाजप्रबोधन करण्यात आले. मधुसूदन महाराज यांनी कीर्तनातून आईवडिलांचा सांभाळ करावा, असे आवाहन केले.आई -वडिलांची भगवंताची सेवा हाच धर्म असल्याचे त्यांनी सांगितले. समाज जीवनप्रवासावर प्रबोधन केले.धनंज येथील ग्रामस्थांच्या व सप्ताह समितीच्या वतीने मधुसूदन महाराजांचा सत्कार करण्यात आला.दहीहंडीच्या कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. सप्ताहाची सांगता होताच धनंज ग्रामस्थांच्या वतीने पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## मारतळा येथे एटीएम फोडण्याचा प्रयत्न रक्कम मात्र सुरक्षित
## समर्थ मोबाईल शॉपीलाही केले लक्ष ५६ हजारांचा मुद्देमाल लंपास

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मारतळा येथील मुख्य बाजारपेठेतील एटीएम फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला. या प्रयत्नात या एटीएमचे मोठे नुकसान झाले असले तरी त्यातील रक्कम मात्र सुरक्षित आहे. या घटनेनंतर चोरट्यांनी लगतच्या एका मोबाईल शॉपीला लक्ष्य करीत रोख रक्कम व मोबाईल असा ५६ हजाराचा मुद्देमाल लंपास केला. दि.१२ एप्रिलच्या रात्री ही घटना घडली. लोहा तालुक्यातील मारतळा हे मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. येथे नागरिकांच्या सुविधेसाठी इंडिया नंबर वन कंपनीने एटीएम सुरू केले आहे. दि.१२ एप्रिल रोजी रात्री चोरट्यांनी या एटीएमचा स्क्रीन व अन्य साहित्य दूर करून एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला परंतु चोरट्यांना त्यात यश आले नाही. परंतु यात या एटीएमचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.



या घटनेनंतर चोरट्यांनी लगतच्या समर्थ मोबाईल शॉपीला लक्ष्य केले.

दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी दुकानाच्या गल्ल्यातील रोख ५० हजार रुपये व ६ हजाराचा म ोबाईल असा एकूण ५६ हजाराचा मुद्देमाल चोरुन नेला. सकाळी हा प्रकार लक्षात आला. या प्रकरणी मोबाईल शॉपीचे मालक विकास भास्करराव सावळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उस्म ाननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक हे करीत आहेत.

## त्यांनी विद्यार्थ्यांना फोडाफोडीची अन गद्दारीची.......
## गुलाबराव पाटलांवर दानवेंचा हल्लाबोल

शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. आम्ही जसे पक्षातील कार्यकर्ते फोडतो तसे तुम्ही विद्यार्थी फोडा असं वक्तव्य शाळेतील पटसंख्या वाढवण्यासंदर्भात बोलताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं होतं, पाटील यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना दानवे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.नेमकं काय म्हणाले दानवे? आम्ही जसे पक्षातील कार्यकर्ते फोडतो तसे तुम्ही विद्यार्थी फोडा असं वक्तव्य शाळेतील पटसंख्या वाढवण्यासंदर्भात बोलताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं होतं, पाटील यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना दानवे यांनी जोरदा टोला लगावला आहे. मला वाटतं की गद्दारीची आणि फोडाफाडीची सवय त्यांनी विद्यार्थ्यांना लावू नये, असा टोला यावेळी अंबादास दानवे यांनी मंत्री पाटील यांना लगावला आहे. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, या भेटीवेळी त्यांनी आपल्या फाईलींवर अर्थ खातं सह्या करत नसल्याची तक्रार अमित शाह यांच्याकडे केली. यावर देखील दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सगळे मिळूनच या गोष्टी करत असतात, जशा यांच्या फाईल अडवल्या जातात तशा त्यांचीही काही गोष्टी अडवल्या जातात. मला असं वाटतं हे राज्याच्या मंत्रिमंडळातील मोठे नेतेच करत असतात. ज्याच्यात दम आहे त्याच्या फाईली बरोबर मंजूर होतात, असं यावेळी दानवे यांनी म्हटलं आहे.दरम्यान सध्या शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून राज्यात पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे. महायुतीच्या नेत्यांच्या कर्जमाफीसंदर्भातील वक्तव्यांमुळे कर्जमाफी संदर्भात शेतकऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम असल्याचं दिसून येत आहे. यावर देखील दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या सरकारने त्यांच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं होतं. हे सरकारने पूर्ण केलं पाहिजे.आता फक्त शेतकरी आवाज उठवत आहेत, येणाऱ्या काळात सर्व पक्ष मिळून जनआंदोलन या महाराष्ट्रात उभा करू असा इशाराही यावेळी दानवे यांनी दिला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### मुलाची मानसिकता आणि ऑनलाइन विश्व

तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुला-मुलींचे जग पालकांना कळते आहे का आणि, त्याही पुढे जाऊन समाज म्हणून तरी त्याचे आकलन झाले आहे का या दोन्ही प्रश्नांसाठी बहुतांशांचे उत्तर ङ्गनाहीफ, असेच असेल, तर हे प्रश्न समजून घेण्यास पालक, समाज मुळात उत्सुक आहे का आणि कसा, यांच्या उत्तरावर या दोन्ही प्रश्नांची उकल अवलंबून असेल, असे सध्यापुरते म्हणायला हवे. ङ्गसध्यापुरतेफ अशासाठी, की ज्या वेगाने सभोवताल बदलतो आहे, त्यात या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे दर काही काळानंतर नव्याने शोधावी लागतील, अशी स्थिती आहे. म्हणूनच, सध्या भारतासह जगभरात मोठ्या प्रमाणात पाहिली जात असलेली ङ्गॲडोलसन्सफ ही ङ्गनेटफ्लिक्सफ या ओटीटी मंचावरील मालिका आणि त्यापाठोपाठ ङ्गइन्स्टाग्रामम वरील ङ्गलाइव्हफ या सुविधेवर १६ वर्षांखालील मुलांसाठी आणले गेलेले काही निर्बंध, या दोन्ही अलीकडच्या गोष्टींकडे उपरोल्लेखित प्रश्नांच्या परिप्रेक्ष्यात पाहायला हवे. तशा पाहू गेलो, तर कदाचित त्या अधिक खोलात जाऊन समजून घेता येतील. ङ्गमेटाफ या कंपनीने काही दिवसांपूर्वीच १६ वर्षांखालील मुलांना ङ्गलाइव्हफ ही सुविधा वापरायची असेल, तर पालकांची परवानगी आवश्यक असेल, असे बंधन घातले. सध्या काही पाश्चात्त्य देशांसाठी हा नियम आला असला, तरी लवकरच तो जगभरात इतरत्रही लागू होईल. त्याचप्रमाणे १८ वर्षांखालील मुलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले काही उपाय ङ्गमेटाफने आपल्या ङ्गफेसबुकफ आणि ङ्गमेसेंजरफ या मंचांनाही लागू केले. या सगळ्याचा थोडक्यात उद्देश हा, की एक तर आपली षोडशवयीन, पौगंडावस्थेतील मुले या समाजमाध्यमांवर काय करतात, यावर पालकांचे नियंत्रण यावे आणि दुसरे म्हणजे, या अडनिड्या वयात नग्नता, हिंसा याबाबतचे वाईट चित्रण त्यांच्यापर्यंत शक्यतो न पोहोचण्याचीच तजवीज व्हावी. ही उपयोजने मुलांनी किती वेळ वापरावीत, यावर निर्बंध घालणे, तसेच कोणत्या खात्याशी (व्यक्ती वा निनावी, बनावट नावांचे समूह) आपल्या पाल्याचा संवाद सुरू आहे, हे समजणेही पालकांना आता शक्य होणार आहे. जगभरात १८ वर्षांखालील साडेपाच कोटी मुले - ज्यातील ९० टक्के मुले १३ ते १५ वर्षे वयोगटातील आहेत - इन्स्टाग्राम वापरतात, ही आकडेवारी या उपायांची व्याप्ती का मोठी आहे, हे सांगण्यास पुरेशी ठरावी. आता हे उपाय कितपत प्रभावी ठरतील, हा आणखी वेगळा विषय. पण, मुळात या कोटीतल्या आकडेवारीसाठी हे उपाय का करावे लागले असतील, या प्रश्नाचे उत्तर शोधायचे, तर ते काही अंशी ङ्गॲडोलसन्सफ मालिकेत दडलेले आहे. योगायोग असा, की ही मालिका येऊन काही आठवडे होतात ना होतात, तोच ङ्गइन्स्टाग्राममवरील या निर्बंधांची घोषणा झाली. त्यामुळे दोन्हींचा अनुबंध जोडला जाणे साहजिकच. ङ्गॲडोलसन्सफ ही जेमी या १३ वर्षीय मुलाची मानसिकता ऑनलाइन विश्व शब्दशः कसे घडवते वा बिघडवते, याची गोष्ट आहे. पौगंडावस्थेतील एखादे मूल त्याच्या वाट्याला येणाऱ्या नकारात्मकतेमुळे हिंसेपर्यंत कसे पोहोचते, याची जितकी ही कथा आहे, तितकीच त्याच्या मनात अशी काही खळबळ सुरू आहे, याची जराशीही चुणूक न लागल्याने त्याला समजून घेण्यात कमी पडलेल्या त्याच्या बापाच्या, पालक म्हणून वाट्याला येणाऱ्या हरलेपणाचीही ही कथा आहे. ङ्गइन्स्टाग्रामम च्या पालक नियंत्रणाकडे पालकांचेच फार कमी लक्ष असते, असे निरीक्षण ङ्गमेटाफच्याच एका अधिकाऱ्याने मध्यंतरी नोंदवले होते. या पार्श्वभूमीवर तर, मालिकेतील जेमीच्या वडिलांचे हरलेपण अधिक गहिरे आणि मन खाणारे. आणि, म्हणूनच हा सगळाच विषय केवळ ङ्गइन्स्टाग्रामम वरील निर्बंध आणि ङ्गॲडोलसन्सफ सुन्न करणारी आहे, असा या मालिकेला भारतासह जगभरातून मिळत असलेला प्रतिसाद, या दोन घटितांच्या पलीकडचा पौगंडावस्थेचा आणि त्यातील न सुटलेल्या गु ंतागु ंतीच्या प्रश्नांचाही आहे. पौगंडावस्थेत शिरण्याच्या आणि ती संपवून तारुण्याच्या उंबरठ्यावरच्या - १३ ते १९ वर्षे वयोगटातील, ज्याला इंग्रजीत ङ्गटीनएजफ म्हटले जाते, त्या मुलांची मानसिक जडणघडण कशी होते, या प्रश्नाला अनेक पदर आहेत. या वयोगटातील मुलांमध्ये होत असलेले शारीरिक बदल आणि ते समजून घेऊन त्यांना सामोरे जाण्याची मुलांची आणि पालकांची तयारी ही त्यातील पहिली पायरी. मुलगा आणि मुलगी या दोघांनाही ते नीट समजावून सांगितले जातात का, त्यातून निर्माण होणाऱ्या मानसिक गु ंत्यांकडे कसे पाहिले जाते, हे यातील पालक-मूल या पातळीवरचे अगदी प्राथमिक प्रश्न. ते सोडवतानाच होणारी दमछाक सावरताना न सांगता उभे राहणारे इतर तिढे, उदाहरणार्थ, संगत, अभ्यासाचा ताण, शाळा-शिकवणी वर्गांतील दुसऱ्याबरोबरील तुलनेचे ओझे, मैत्री-प्रेम-नाते याबद्दलचे अत्यंत अनघड ताणेबाणे, मित्र मैत्रिणींचे कंपू वा आजूबाजूचे लोक आदींमध्ये वावरताना शारीरिक ठेवण, रूप, आर्थिक स्थिती, कपडे अशा कारणांवरून होऊ शकणारी हेटाळणी, संपर्काच्या गरजेपोटी अपरिहार्यपणे मोबाइल फोन हातात पडल्यानंतर लागू शकणारे ऑनलाइन राहण्याचे व्यसन किंवा माझे काही करायचे राहून जाऊ नये, सुटू नये (फोमो), या भावनेतून त्यावर असण्याची असलेली अप्रत्यक्ष सक्ती, त्यातच दहावीनंतर काय, या प्रश्नाला पुढच्या करिअरशी जोडून ठेवल्याने वाढलेला ताण असे नानाविध प्रश्नराक्षस या वयोगटापुढे आणि पर्यायाने त्यांच्या पालकांपुढेही उभे आहेत. त्याला सामोरे जाण्याचे उत्तर ना शिक्षणव्यवस्थेत आहे, ना समाजव्यवस्थेत. जो तो पाल्य-पालक आपापल्या परीने त्यांची उत्तरे शोधू पाहतो. त्यात कधी अतिबंधने आणि अतिशिस्तीने माती होते, कधी अतिमोकळेपणा, अतिस्वातंत्र्याने बेफिकिरी वाढते,

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान





१४ एप्रिल या सोनेरी दिवसाचे समाजाच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. देशातील कोट्यवधी दीनदुबळ्यांसाठी तसेच देशासाठी हा दिवस फार आनंददायी आहे. या दिवशी दिवसभर मोठ्या उत्साहाने खेड्यापाड्यांपासून ते दिल्लीपर्यंत डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी म्हणजे एम.ए. पदवीसाठी २५ जुलै १९१३ रोजी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश केला. प्रो. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली जून १९१५ मध्ये एम.ए.ची पदवी संपादन केली.

ऑक्टोबर १९१६ मध्ये इंग्लंडमध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथे एम.एस.सी. इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश केला. प्रो. कॅनन आणि सेडनी वेब यांच्या मार्गदर्शनाखाली १९२० मध्ये पदवी संपादन केली. पुढे १९२२-२३ मध्ये युनिव्हर्सिटी इन बॉन जर्मनीमध्ये डी.एस.सी. पदवीचा अभ्यास पूर्ण केला व पदवी संपादन केली. म्हणजे एम.ए. , पीएच.डी., एलएल.डी., डॉ. डिलिट, बार ॲट लॉ इत्यादी पदव्यांनी उच्चविद्या विभूषित बाबासाहेब आंबेडकर झाले. बाबासाहेबांनी जगातील सामाजिक शास्त्रांचा (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आणि कायदा शास्त्र) सखोल अभ्यास केला. त्याचबरोबर जगातील साम्राज्यशाही, भांडवलशाही, जगातील युद्ध, स्वाऱ्या, लढाया आणि विविध क्रांत्यांचा अभ्यास केला. तसेच वंशवादाचा आणि जागतिक स्तरावर असलेल्या गुलामांच्या जीवनांचा अभ्यास केला. डॉ. बाबासाहेबांच्या वाचनात, चिंतनात व लेखनात प्रचंड ताकद, शक्ती होती. ज्ञानसंपन्नतेच्या शक्तीमुळेच व्यक्ती, समाज, राज्य आणि राष्ट्र महान बनत असते, याची त्यांना पुरेपूर जाणीव झाली होती. त्यामुळे १८-१८ तास अभ्यास करून शेकडो वर्षांचा शिल्लक राहिलेला ज्ञानाचा बॅकलॉग बाबासाहेब भरून काढत होते.डॉ. बाबासाहेबांनी तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तिनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकवले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केले. असे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त त्रिवार मानाचा मुजरा...!!

लोकशाही आणि राज्यघटना : जगातील आदर्श समाज निर्माण

करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य आणि त्यांची एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकशाही असली तरीही त्याचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीमध्ये व्हावे, असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे हा देश टिकेल अन्यथा अडचणीत येईल. यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगीण विकास करता येईल, अशी राष्ट्राला राज्यघटना दिली.२१ व्या शतकात देशाला विकासाच्या दिशेने जावयाचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशिवाय पर्याय नाही, असे मला वाटते.

**आंबेडकरांचे लिखाण**

**वृत्तपत्रे - मूकनायक १९२०, बहिष्कृत भारत १९२७, जनता १९३०, प्रबुद्ध भारत १९५६.**

**ग्रंथ - शुद्र पूर्वी कोण होते**

**दि अनूटचेबल्स (अस्पृशूय आणि अस्पृशूयता यावर सिद्धांत लिहिले)**
**प्रॉब्लेम ऑफ दि रुपी**
**पार्टिशन ऑफ इंडिया**
**हिंदू कोड बिल**
**भारताचे संविधान**
**द बुद्धा अँड हिज धम्मा.**
**अशी ५८ पुस्तके व ग्रंथ.**

**– प्रा.सचिन पवार**
**निर्भीड पत्रकार**

## झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले ; भाव नसल्याने उत्पादन खर्चही निघेना ; मुळुकवाडी येथील शेतकरी अशोक ढास यांची खंत :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.१३ ) उन्हाची तिव्रता वाढल्याने टोमॅटो पिकाला याची झळ बसल्याने झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले आहेत. टोमॅटोचे दर घसरले असुन यातुन शेतातील खत, बियाणे, मजूरी याचा प्रचंड खर्च असुन टोमॅटो अवघ्या ५ ते १० रूपये किलो दराने विकावे लागत असुन उत्पादन खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.बाजारातील टोमॅटोची आवक वाढल्याने दरात घसरण झाल्याचे बोलले जाते. उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन विक्रीला परवडत नसल्याने झाडावरच पिकुन गळत असल्याचे सांगत टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ठरल्याची उद्विग्न प्रतिक्रिया मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना दिली.

टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ; उत्पादन खर्चापेक्षा मिळतोय कमी भाव :- अशोक ढास ( टोमॅटो उत्पादक शेतकरी मुळुकवाडी ता.जि.बीड) गेल्या वर्षी टोमॅटोला जवळपास १०० रूपये किलो भाव मिळाला होता. म्हणून टोमॅटोची लागवड केली. एकरी सव्वा लाख रुपयांपर्यंत खर्च आला. टोमॅटोचे पिक सुद्धा चांगले



आले आहे.मात्र भाव नसल्यामुळे टोमॅटो विक्रीसाठी काढायला सुद्धा परवडत नाही. १०० रूपये कॅरेट भाव असुन चाकण,पुणे, नारायणगाव याठिकाणी विक्री साठी पाठवतोत. पण कॅरेट मागे वाहतुक खर्च ६० रूपये, टोमॅटो तोडण्यासाठी महिला मजूर ३०० रूपये रोज तसेच आडत, कमिशन आदी मिळुन ८०-९० रुपये खर्च येतो. म्हणून टोमॅटोची झाडावरच पिकुन गळती होत आहे. चांगला भाव मिळाला असता तर दैना फिटली असती परंतु आपलं नशीब फुटकं म्हणून सहन करायचं अशी मनातली सल अशोक ढास यांनी बोलून दाखवली.

# श्रद्धा उत्सव परंपरा संस्कृतीचा संगम आणि एकात्मिकचे प्रतिक म्हणजे भैरवनाथ यात्रा

आष्टी। प्रतिनिधी आष्टी तालुक्यातील बीडसागवी गणगेवाडी कणसे वाडी गुडेवाडी परिसरातील भाविक श्रद्धास्थान आसलेले बीडसागवी येथील भैरवनाथाचे आज शनिवार ह्या रोजी उत्साहात साजरा केली. श्रद्धा आणि भाव भक्ती चा मेळ साधत शेकडो वर्षे पासून सुख समृद्धी चा घेत बीडसागवी भैरवनाथ यात्रा म्हणजे बीडसागवी येथील साठी एक पर्वणीच..,. ! गावचा यात्राः एक सांस्कृतिक आणि मेळावा बीडसागवी तील यात्रा म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नसून ती एका सामाजिक मेळावा आहे जिथे सर्व गावकरी एकत्रित येऊन आनंदित होतात आणि आफली परंपरा जपतात यात्रेच्या निमित्ताने सहभागी होतात यात्रेची दिवस चैत्र पौर्णिमा हनुमान जयंती आहे बीडसागवी गावातील तरुण मंडळी पैठण नाथांच्या काकडी गंगा जल आणण्यासाठी पैठण कडे प्रस्तान करतात आणि पैठण कडून गंगाजल घेऊन येतात चैत्र पौर्णिमेला भल्या पहाटे हनुमान भैरवनाथ भव्य दिव्य



जम्योतसव साजरा करण्यात आली आहे यावेळी सकाळी पासून भाविक भक्त गावातील प्रत्येक घरातील व्यक्ती शेरगी गुळ वाटतात सायंकाळी बीडसागवी सरपंच नंदकिशोर कराडे सुभाष तात्या गणगे बबनराव कराडे बारकु ढोबळे कल्याण मोहरकर संतोष आबा कराडे यांच्या सह ग्रामस्थ भैरवनाथ आरती साजरी केली आहे आरती झाल्या नंतर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली आहे यावेळी उपस्थित माजी उपसरपंच रजित ढोबळे आ. सुरेश आणा धस यांचे पिए विकास तात्या साळवे सोमनाथ घुले उपसरपंच माजी उपसरपंच सदिप कराडे महादेव चव्हाण कृष्ण पानतावणे, संतोष घुले विजय डुकरे विजय कराडे जालीधर देवकर महादेव घुले पोपट करडु ळे विठ्ठल नरवडे शहादेव चव्हाण बापुराव दिवटे दादासाहेब साळवे संजय बावणे विठ्ठल शेळके हिराजी बाबणे अशोक बावणे संतोष नरवडे सपत ढोबळे संजय डुकरे सोमनाथ करडुळे गोकुळ नरवडे बाबा पठाण किरण पारिख जगन्नाथ करडुळे गोरख देवकर राजु कराडे सुदाम मोरे मनोहर गोरे संतोष गोरे यावेळी पंच कमिटीने संतोष कराडे जालीधर देवकर बारकु ढोबळे महादेव चव्हाण यांचे सहकार्य लाभले आमची गावातील यात्रा पश्चिम महाराष्ट्र उसतोडणी साठी हमाली करण्यासाठी पनवेल संभाजीनगर पुणे येथे मुले शिकण्यासाठी यात्र साठी एकत्रित येतात ज्यामुळे सामाजिक संबंध द्रढ होतात गावकरी एकमेकांशी भेटतात गप्पा मारतात सगळे बाहेर गेलाले यात्रा वाटत पाहत असते, बीडसागवी यात्रा सांस्कृतिक परंपरा रुढी जतन करण्यास मदत केली जाते यात्रा लोकांना एकत्रित घेऊन एकतेची भावना वाढते आणि सहकार्य ची प्रेरणा मिळते यात्रा लोकांना आनंद आणि उतसाने भरुन टाकते जीवनात नवीन ऊर्जा मिळते.

## उमरा परसराम तांडा येथील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती मुके जनावरे ही पंधरा दिवसापासून तहानलेलेच

### विहीर मालकाचा पाणी देण्यास नकार-ग्रामपंचायत आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील परसराम तांडा येथे भर उन्हाळ्यात ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे व पाणीपुरवठ्यासाठी शासनाने अधिग्रहण केलेल्या विहीर मालकाचा पाणी देण्यास नकार असल्यामुळे गेल्या पंधरा दिवसापासून परसराम तांडा येथे भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने रहिवाशी नागरिकासह मुक्या जनावरांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून पाणी पुरवठा लवकर सुरळीत करून देण्याची मागणी तांडावासीय करत आहेत.तर या समस्येकडे उमरा ग्रामपंचायत व प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष होतांना दिसत आहे.विहीर मालक पाणी देण्यास नकार देत असल्यामुळे भर उन्हाळ्यातच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तर दोन ते तीन किलोमीटर भर उन्हात पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागत आहे. लोहा तालुक्यातील उमरा हे शेवटच्या टोकावरील सर्कलचे गाव आहे. तसेच पाच तांडे मिळून येथे गट ग्रामपंचायत असल्याने या गावासाठी शासनाचा मोठा निधी येतो मात्र म्हणावा तसा विकास झाला नाही.जणू काय या तांड्यात शिक्षण आरोग्य पाणी प्रश्न पाचवीलाच पुंजलेला आहे की काय असा भाबडा प्रश्न ग्रामस्थातून उपस्थित होत आहे.२००८ मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद नांदेड पंचायत समिती लोहा ग्रामपंचायत उमरा अंतर्गत सुगाव तालुका लोहा येथील शेत गट क्रमांक ३०६ मध्ये माणिका उमाजी पांचाळ यांच्या शेतामध्ये शासनाने परसराम तांडा येथे पाणीपुरवठ्यासाठी विहीर खोदून दिली.तेव्हापासून आज पर्यंत ह्याच विहिरीतून तांड्याला पाणीपुरवठा होत होता परंतु गेल्या १५ दिवसापासून तेथील शेतमालकाच्या मनमानी व उमरा ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे भर उन्हाळ्यातच परसराम तांडा येथे भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांसह मुक्या जनावरांनाही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. या बाबतीत नागरिकांनी सरपंच ग्रामविकास अधिकारी यांना तांड्यातील पाण्याची समस्या पूर्ववत करून आमच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्याची विनंती केली असता पाहू बघू असेच उत्तर मिळत आहेत.याव्यतिरिक्त त्यांच्याकडूनही कोणताही प्रतिसाद मिळत नसून पाणी प्रश्नासाठी लवकरच जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे धाव घेणार असल्याचेही ग्रामस्थांकडून कळाले.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# प्राजक्ता धसांचे अपिल जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळले

बीड येथून प्रकाशीत होणारे सा.शेतकर्यांचे वादळ या वृतपत्राचे संपादक शेखर कुमार यांचे विरूध्द फिर्यादी प्राजक्ता धस यांनी, विरोधात बातमी छापल्याच्या कारणा वरून व बदनामी केल्या बाबत आष्टी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. सदर तक्रारी वरून गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणी आष्टी न्यायालयात त्याची सुनावणी होवून तेव्हा आष्टी न्यायालयाने संपादक शेखर कुमार यांची निर्दोष मुक्तता कली होती परंतू सदर निकालाच्या नाराजीने प्राजक्ता धस यांनी बीड येथील मा.सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते. परंतू सदरचे अपील मा.जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावले आहे. या बाबत अधिक माहिती अशी की संपादक शेखर कुमार यांनी प्राजक्ता धस यांच्या विरोधात २०१४ मध्ये बाबतमी छापल्याच्या आरोपावरून शेखर कुमार यांच्या विरूध्द आष्टी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून त्यांच्या विरूध्द कलम ३८५,५०१,५०२, भादवि नुसार गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्यात संपादक शेखर कुमार यांचेवर फिर्यादीने गंभीर स्वरूपाचे खोटे आरोप केले होते. सदरच्या प्रकरणाची मा.आष्टी न्यायालयात सुनावणी होवून मा.आष्टी न्यायालयाने संपादक शेखर कुमार यांची निर्दोष

# आदित्य शिक्षण संस्थेत २१० जणांची मोफत मोतीबिंदू निदान, नेत्र तपासणी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य संघटनेच्या वतीने १ ते ७ एप्रिल हा आठवडा जागतिक अंधत्व जागृती सप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक ७ एप्रिल सोमवार रोजी आरोग्य दिनानिमित्त मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत तब्बल २१० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून मोतीबिंदूचे निदान करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे उपस्थित होते. व्यासपीठावर



आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आंबाजोगाईतील नेत्र तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. विनोद राहिंज,डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ. नागरे, डॉ. शिंदे, डॉ. अमोल मार्कंड, रामेश्वर ढोबळे, रुग्णालय इन्चार्ज शशिकांत काळे यांची उपस्थिती होती. यावेळी अंबाजोगाईतील प्रसिद्ध नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेने गोरगरीब लोकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन खूप छान प्रकारे केले. त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. त्यांना निमंत्रित केल्याबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका आदिती सारडा आणि संस्थेचे त्यांनी आभार मानले. त्या म्हणाल्या आदित्य हॉस्पिटल मध्ये सर्व अत्याधुनिक उपकरणे असल्यामुळे तपासणी करणे सोपे झाले. याचा रुग्णांना मोठा फायदा होत आहे. डॉ. विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य कसे सुधारावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन -डॉ. प्रगती राख यांनी केले. आभार शशिकांत काळे यांनी मानले.

# शिरूर कासर येथील मस्जिद आणि हनुमान मंदिर: सामाजिक समतेचे प्रतीक

महाराष्ट्रासह देशात मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा आणि चर्च एकाच परिसरात असल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळते. अनेक शहरात हि धार्मिक स्थळे जवळ जवळ तर अनेक ठिकाणी मंदिर मस्जिदची सामाईक भिंत असल्याचे ही दिसून येते. मुस्लिम राजा पासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही अनेक गड किल्ल्यावर सर्व धर्म समभाव पाहायला मिळतो. एकच किल्ल्यावर मंदिर, मस्जिद, बौद्ध विहार असल्याचे दिसून येते. नैनिताल येथील गुरुद्वारा, नैना देवी मंदिर आणि जामा मस्जिद सामाजिक समतेचे एक उत्तम उदाहरण आहे. महाराष्ट्रात अनेक खेडेगावात, शहरात हेच चित्र आजही पहायला मिळते. आज हनुमान जन्मोत्सव मोठा उत्साहात साजरा होत असतानाच शिरूर कासार शहरात मलक बिर्याणी हाऊसफ चालवणारे आसिफ शेख आणि पोलीस दलात काम करणारे जम्मू शेख यांच्या विचारातून साकारणारी सामाजिक समता अन्नदानाच्या स्वरूपात पाहायला मिळाली. मस्जिद आणि हनुमान मंदिराची एकच पाठभित असणारे हे दोन्हीही धार्मिक स्थळे शिरूर कासार शहरात मोठ्या दिमाखात उभे असल्याचे दिसून येते. मुस्लिम धार्मिक स्थळ असणाऱ्या मस्जिद मध्ये रोज नमाज पठण केले जाते तर हनुमान मंदिरात हनुमान चालीसा ऐकली जाते. दोन्हीही समाज एकमेकांच्या धार्मिक भावना समजून घेत गुण्यागोविंदाने इथे नांदताना दिसून येतात. हिंदू मुस्लिम दोन्हीही समाज एकमेकांच्या धार्मिक कार्यासह सामाजिक कार्यातही अगदी मोठ्या आनंदाने सहभागी होताना दिसून येतात. आसिफ शेख आणि जम्मू शेख या मुस्लिम बंधू चे करावे तेवढे कौतुक कमीच कारण आजच्या प्रॅक्टिकल असणाऱ्या जगात आपल्या धर्मासोबत इतर धर्माची ही संवेदना जपणारे हे मुस्लिम बांधव हनुमान जयंती साठी मभात, कडी आणि लापसीफ हा रूढ असलेला प्रसाद अन्नदान करत सामाजिक समता दृढ करताना दिसून आले. कोणताही धर्म असो तो माणुसकीच शिकवतो याचे उत्तम उदाहरण या मुस्लिम बांधवाकडे बघून लक्षात येते. ही संवेदनशीलता जपणाऱ्या आणि जनमानसात सामाजिक समता पेरणाऱ्या मुस्लिम बांधवांना सलाम.

# हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र-राजेंद्र मस्के

बीड ।किसान न्यूज प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.यावेळी राजेंद्र मस्के यांनी भक्तांना संबोधीत करताना संबोधीत केले. अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा एक पवित्र सोहळा आहे. हरिनाम सप्ताहा दरम्यान घडणारे प्रभूचे नामस्मरण भजन, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून भक्तिरस अनुभवता येतो. नामस्मरणाने मनाला शांती मिळते, मानसीक तणाव दूर होण्यास मदत होते. ईश्वरावरील श्रद्धा वाढीस लागते. ईश्वरा पुढे सर्वजण समान असतात या भावनेतून अशा मंगलमय सोहळ्यात भेदभाव विसरून ईश्वर भक्त निरपेक्ष भावनेने सहभागी होतात. समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि परस्परांत सहकार्य भावना निर्माण होते. ग्रामीण संस्कृतीत सप्ताहाला वेगळं महत्त्व आहे. गावो गावी होणारे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र व्हावेत अशी भावना शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बेलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाविक भक्तांना संबोधित करताना व्यक्त केली आहे. प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.यावेळी अश्विन शेळके, दिलीप शेळके, जाधव अशोक, अंकुश शेळके,बबन शेळके, सुखदेव कोळपे, महेश सावंत, कल्याण पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दीक्षांत सोहळा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा महाविद्यालयीन स्तरावर संपन्न झाला. यावेळी मार्च / एप्रिल २०२४ व ऑक्टोबर २०२४ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सु ंदरराव सोळंके महाविद्यालयात घेण्यात आलेल्या दीक्षांत सोहळ्यात प्रमाणपत्राचे वाटप प्राचार्य डॉ.मुकु ंद देवर्षी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.



के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, भाषा विषयाचे प्रमुख डॉ.के. बी. गंगणे, विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.प्रविण देशपांडे,सामाजिकशास्त्र प्रमुख डॉ. अरुण पेंटावार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सचिन रुद्रवार अधिक्षक सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सूचनेनुसार २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालय स्तरावर घेण्यात आला. यावेळी बी. ए. ,बी.एस्सी, बी. कॉम, बी.सी.ए., बी.सी.एस. व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती

# महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सव, शाहीर शीतल साठे सचिन माळी माजलगावात

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मोत्सवा निमित्त माजलगावच्या फुले, आंबेडकर जन्मोत्सव जयंती कमिटीने यावर्षी दि. १२/४/ २०२५ रोजी क्रांतिकारी शाहीर शितलताई साठे व सचिन माळी यांच्या सह कलावंतांचा बुद्ध भीम गीतांचा प्रबोधनात्मक नवयान महाजलसा या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक जयभीम नगर जुना मोंढा माजलगाव येथे करण्यात आलेले आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर विचाराच्या नवयान महा जलसा १२/४/२०२५ रोजी सायंकाळी ७ वा. जयभीम नगर माजलगाव येथे होणार आहे तरी या कार्यक्रमाला सर्व महात्मा फुले समतावादी व शिव, फु ले, आंबेडकरवादी विचारांच्या अनुयायांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन फु ले, आ ंबेडकर जन्मो ंत्सव समिती जयभीम नगर अविनाश बनसोडे, चंद्रमुनी डोंगरे रूपचंद कांबळे, किशन भदर्गे दीपक कसबे, राहुल कांबळे, विनय पोटभरे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या सर्वानी केले आह

# प्रत्येक कार्यालयात आमदारांची ब्लॅकमेलींग-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून जाचक स्वरूपात ब्लॅकमेलिंग केली जात आहे. नगरपरिषदेतील कर्मचाऱ्याला शिवीगाळ करून धमकी देणे हा त्याचाच एक भाग असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले. योगेश क्षीरसागर यांनी पुढे म्हटले की, संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मी तक्रार करणार आहे. एवढंच नाही तर इथल्या रजिस्ट्री ऑफिस, तहसील कार्यालय, पंचायत समिती, जिल्हा परिषद याठिकाणी ब्लॅकमेलिंग केली आहे. याबाबतची तक्रार मी अजित पवार यांच्याकडे करणार आहे. त्यांनी संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात माध्यमांसमोर तक्रारीचा पाढाच वाचला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री हे खुद्द राज्याचे कर्तव्यकठोर उपमुख्यमंत्री अजित पवार हे आहेत. याप्रकरणात ते लक्ष घालतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



बीडः मिलिया प्राथमिक मुलाचे शाळेचे मुख्याध्यापक शेर खान सर यांच्या वाढदिवस साजरा करताना. पठाण अमजद. शेख वासिम. सिनियर क्लार्क इम्रान सर. मोमीन आजरोद्दीन सर इक्बाल सर मिलियाचे संपूर्ण स्टॉप या वाढदिवस निमित्तने शाळा मध्ये वर्षेरोपण कार्यक्रम करण्यात आला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती व्याख्यानमाला इतिहासाची खेळाल तर भविष्य बिघडेल : डॉ.सतीश साळु ंके

अलीकड े देशाच्या राजकारणात इतिहास केंद्रस्थानी आला आहे. खोटा इतिहास सांगून लोकांची माथी भडकवल्या जात आहेत. इतिहासाचा अभ्यास चालू वर्तमानावर नव्हे तर इतिहासात घडलेल्या घटनेच्या तत्कालीन वर्तमानावर व्हायला हवा. फुले-शाहू-आंबेडकर या युगप्रवर्तक महापुरुषांविषयी विवादास्पद उद्गार कढून समाजात दुफळी मागवण्याचे षडयंत्र हाणून पडायला हवे असे प्रतिपादन डॉ. सतीश साळु ंके यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानामालेचा अध्यक्ष समारोप करताना डॉ. साळुंके बोलत होते. यावेळी प्रमुख व्याख्याते डॉ. प्रकाश शिरसाट तसेच सुभाष साळवे,सखाराम उसगरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान कांडेकर यांनी केले डॉ. सतीश साळु ंके म्हणाले की, महात्मा फुलेंच्या मतृतीयरत्नफ नाटकाला१८५५ साली दक्षिणा प्राइड कमिटीने नाकारले. वास्तविक नाटकाच्या संकल्पनेत बसणार हे मराठी नाट्य इतिहासातले पहिले नाटक होते. त्यामुळे महात्मा फुले हे मराठी भाषेचे आद्य नाटककार ठरतात. मात्र बहुजन दलित समाजातील प्रतिभावंतांच्या प्रतिभा ठेचून काढण्याचं काम प्रास्तापित मंडळी शेकडो वर्षांपासून करीत आहे आणि त्यात बहुजन समाजाची मंडळी ही सामील आहे याचे दुःख वाटते असे सांगून डॉ. साळु ंके म्हणाले की, दिनबंधू वृतपत्रावरून झालेल्या वादानंतर कृष्णराव भालेराव



फुलेंना सोडून गेले. ते फुले यांच्या विरोधात लिहू लागले आणि त्याला उत्तर म्हणूनच फुलेंनी मसार्वजनिक सत्यधर्मफ हा ग्रंथ लिहिला. यावेळी डॉ. साळुंके यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या नाट्य प्रेमाविषयी ही माहिती दिली. ते म्हणाले, बाबासाहेब इंग्लंडला शिकल्याने विल्यम शेक्सपियर या जगविख्यात नाटककाराचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. बाबासाहेबांनी शेक्सपियरच्या किंग क्लियर या नाटकाचे मराठीत मशहाणी मुलगीफ या नावाने भाषांतर केले. त्याचे प्रयोगही केले. इतकेच नव्हे तर औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयात १९५५ साली दलितांवर होणाऱ्या युगायुगाच्या अन्यायाला वाचा फोडणारे मयुगयात्राफ हे नाटक त्यांनी मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य म.भी. चिटणीस यांच्याकडून लिहून घेतले. त्याचे प्रयोग करून भारतीय दलित रंगभूमीचा पाया घातला. गोविंदराव जवळकरांच्या मदेशाचे दुश्मनफ या पुस्तकावर ब्रिटिशांनी आणलेल्या बंदीच्या विरोधात लेखकाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी जवळकरांच्या तर्फे बाबासाहेब कोर्टात लढले आणि जिंकलेही. डॉ. प्रकाश शिरसाट आणि यांनी यावेळी अभ्यासपूर्ण विचार मांडले ते म्हणाले, सर्वच महापुरुषांना सामावून घेण्यात त्यांचे अनुयायी चुकत आहेत. महापुरुषांच्या उत्तु ंग विचारांना समजून घेणारे अनुयायी दुर्दैवाने महापुरुषांना न लाभल्याने महापुरुषांचे वास्तविक विचार समोर येण्यास अडथळे निर्माण होत आहेत. डॉ शिरसाट यांनी बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जीवनातील विविध घटनांचा अन्वयार्थ यावेळी नमूद केला. कार्यक्रमास सूत्रसंचालन प्रा. जाधव यांनी केले तर आभार स्वप्नील चोपडे यांनी मानले.. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष गौतम चोपडे, प्रा. प्रदीप रोडे, सुमेत जोगदंड, नितीन वाघमारे, मनोज वाघमारे, यांच्यासह बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक व उत्सव समितीचे सर्व सदस्य आणि श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी डॉ.डॉ शिरसाट यांचा सन्मानचिन्ह देऊन

# खासदारांनी घेतली सलग तीन तास रेल्वेची मॅरेथॉन बैठक : बीड-नगर-मुंबई रेल्वे सुरु करण्याचे दिले निर्देश

बीड: अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम या पूर्वीच्या बैठकांमधे निश्चित करुन देण्यात आलेल्या वेळेत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत असतानाच कामाची गती मंदावू देऊ नका. बीड ते परळी रेलमार्गासाठी बाधित होत असलेल्या शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मावेजा देताना काटकसर करु नका. भुसंपादनाची उर्वरित प्रकरणे तातडीने मार्गी लावा. विद्युतीकरणाच्या कामात येत असलेले अडथळ्यांवर मार्ग काढीत असताना रेल्वे क्रॉसिंगची काही कामे अर्धवट असून ती तातडीने पुर्ण करा. रेल्वेमार्गास विद्युत जोडणीच्या कामाला गती द्या, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी केल्या. दि.११ एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता लोळगे तसेच पाटोदा, बीड, माजलगाव महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, आहिल्यानगर आणि नांदेड रेल्वेचे मुकुंद नाईक, एम सुरेश, निगम, एस.आर.कुवर, संजय श्रीवास्तव, यादव, एस.के.मंडल, मानसिंग हे अधिकारी उपस्थित होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाला विद्युत जोडणीच्या कामाची सद्यस्थिती, आष्टी येथील स्थानकास विद्युत जोडणी देणेबाबतच्या कामाची सद्यस्थिती तसेच बीड ते वडवणी बीटमधील विद्युतलाईनचे कामाची स्थिती. वडवणी ते सिरसाळा बिट कामाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर आढावा घेतला. सुकळी, खामगाव व तपोवन या भागातील



नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वेमार्गामधे प्रस्तावित करायच्या अतिरिक्त उपाययोजना, सिरसाळा ते परळी कामाची सद्यस्थिती. परळी-परभणी डबल लाईन कामामुळे बाधित होत असलेल्या (परळी)आजादनगर येथील नागरिकांवर कसलाही अन्याय होणार नाही याची दक्षता घेऊन सदरील काम तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बीड- नगर-मुंबई व बीड-नगर-पुणे इंटरसिटी सेवा चालू करणेसाठी करावयाच्या कामांबद्दल सुचना दिल्या. रायमोह, धनगरवाडी यासह अनेक भागातील शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मावेजा बाबत निर्देश दिले.

अधिकाऱ्यांचे आभार अन् अभिनंदन दि.१८ जून २४ च्या रेल्वे प्रकल्प बैठकीमधे ठरल्यानुसार आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग प्रकल्पातील बीडपर्यंतचे काम व गती चाचणी वेळेत पूर्ण केल्याबद्दल खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे विभागाचे सर्व अधिकारी, भुसंपादनाशी संबंधित महसूल विभागाचे अधिकारी व विद्युत विभागाचे संबंधित अधिकारी या सर्वांचे आभार मानत अभिनंदन केले. या कामांचे मागविले प्रस्ताव आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी, कडा तसेच पाटोदा तालुक्यातील गांधनवाडी, कारेगाव आणि शिरुर तालुक्यातील गोमळवाडा, विघनवाडी, हिवरसिंगा, घुगेवाडी/बरगवाडी आणि बीड तालुक्यामधे नवगण राजुरी, च-हाटा, धानोरा रोड या सर्व ठिकाणी रेल ओव्हर ब्रिज व बीड शहरालगत ढोलेवस्ती येथे रेल अंडरपास बांधण्याचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या. मुंबई येथील मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर यांचेशी प्रस्ताव व निधी मंजुरीबाबत चर्चा केली. धाराशिव-बीड-छ.संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणास गती देण्याबाबत संबंधित अधिकारी यांना सूचना दिल्या. बार्शीनाका (इमामपूर) येथे अतिरिक्त रेल्वे थांबा देणे, नगर-बीड-परळी रेल मार्गावरील सर्व प्रमुख स्थानकाना लागणारी वीज उपलब्ध करणेसाठी स्थानकांवर सोलार उर्जा निर्मिती प्रकल्प तयार करावेत. यासाठी आवश्यक निधीच्या मागणीसह स्वतंत्र प्रस्ताव जनरल मॅनेजर यांचे कार्यालयास सादर करावेत अशा सूचना देण्यात आल्या.

# माजलगावात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे आयोजन माजलगावात दि.११ एप्रिल २०२५ रोजी समता परिषद व ओबीसी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी ११ वा. आमदार प्रकाश दादा सोळंके बहुजन नेते बाबुराव पोटभरे आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले , माजी सभापती कल्याण आबुज,माजी जि प सदस्य शिवप्रसाद खेत्री, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, डॉ. किशोर भोपळे, ओबीसी नेते लक्ष्मण गायकवाड, नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, युवा नेते नवनाथ गायकवाड शिवसेना शहराध्यक्ष धनंजय पापा सोळंके, मराठा महासंघाचे पुरुषोत्तम जाधव सर, काँग्रेसचे नेते नारायण होके पाटील, युवा सेनेचे अभिजीत कोंबडे, भगवान खेत्रे, भाजपा भटक्या मुक्त आघाडीचे नारायण मेंडके, आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष अशोक ढगे, ग्रामसेवक गणेश क्षेत्रीय आदी नी उपस्थित राहुन अभिवादन केले या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने समता परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष चंद्रकांत खेत्री, समता परिषदेचे युवा नेते अनिल हिवरकर, आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# राज्यात दोन दिवसांत अवकाळी पाऊस अन गारपिटीचा धुमाकूळ, उष्णतेच्या लाटेबाबत हवामान विभागाचा अंदाज

महाराष्ट्रात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे संकट निर्माण झाले आहे. राज्यात पुढील एक ते दोन दिवसांत पाऊस पडणार आहे. त्यासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात अवकाळीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अवकाळीचे संकट पुन्हा एकदा आले आहे.

का पडणार पाऊस?

पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरामध्ये सक्रीय असलेला कमी दाबाचा पट्टा आता निवळला आहे. परंतु राजस्थानच्या पश्चिमेपासून विदर्भाच्या उत्तरेपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. तसेच तापमान वाढत आहे. त्यामुळे बाष्पीभवन वेगाने होत आहे. त्याचा परिणाम ढग निर्माण होऊन पाऊस पडणार आहे. राज्यात विजांच्या कडकडाटासह गारपीट अन् पाऊस होणार आहे. वादळे वारे ताशी ३०-४० किमी वेगाने वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली होती. राज्यातील काही भागांत पावसाचा यलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. विदर्भात सर्वत्र ४० च्या वर तापमान राज्यातील वातावरणात बदल होत असला तरी इतर भागात तापमानात फारशी घट झाली नाही. मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात कमाल तापमानाचा पारा १ ते २ अंश सेल्सिअसने कमी झाला आहे. परंतु विदर्भात उष्णतेची लाट अजूनही कायम आहे. राज्यात सर्वाधिक तापमान ४२.४ अंश अकोल्यात होते. अमरावती, बुलढाणा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, वाशिम येथेही ४० अंशाच्या वर



तापमान होते. नाशिक जिल्ह्यात रविवारी अवकाळी पाऊस झाला. नाशिकमधील चांदवडच्या ग्रामीण भागात जोरदार अवकाळी पाऊस झाला. पावसासोबत काही ठिकाणी गारा देखील पडल्या. पावसाने सर्वात जास्त शिरवाडे वणी भागाला झोडपून काढले. त्यामुळे काढणीला आलेला गहू, कांदा या पिकांबरोबरच द्राक्षे बागांचे मोठे नुकसान झाले आहे. जळगावमधील रावेरमध्ये अवकाळी पावसामुळे केळीचे नुकसान झाले. नांदेडमध्ये रविवारी जोरदार अवकाळी पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने शेतीचे प्रचंड नुकसान झाले. नांदेड जिल्ह्यात हवामान खात्याकडून येलो अलर्ट केला आहे. यापूर्वी झालेल्या वादळीवारा, अवकाळी पाऊस व गारपुटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

# सोनिया गांधी अन् राहुल गांधींना मोठा धक्का

## ईडीकडून ७०० कोटींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरु

नवी दिल्ली। वृत्तसंस्था लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना मोठा धक्का बसलाय. ईडीकडून नॅशनल हेरॉल्ड केस प्रकरणात ७०० कोटींची संपत्ती जप्त करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. ही कंपनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याशी निगडित आहे. यामध्ये मुंबई, लखनौ आणि दिल्लीतील काही संपत्तीचा समावेश आहे. याशिवाय दिल्लीतील बहादूर शाह जफर मार्गावरील स्थावर मालमत्तेचा देखील यामध्ये समावेश आहे. याबाबतची माहिती शनिवारी (दि.१३) ईडीने दिलीये. ईडीने केलेल्या चौकशीत आर्थिक घोटाळ्याचा खुलासा करण्यात आला होता. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कलम (८) आणि नियम ५(१) अंतर्गत ही कारवाई करण्यात येणार आहे. या मालमत्ता असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) च्या मालकीच्या आहेत, ज्या यंग इंडियन लिमिटेड (वायआयएल) ने विकत घेतल्या आहेत. ईडीचे म्हणणे आहे की सोनिया आणि राहुल गांधी यांचा धरवङ मध्ये मोठा वाटा आहे. ईडीने ११ एप्रिल रोजी मुंबई, दिल्ली आणि लखनौ या तिन्ही शहरांच्या मालमत्ता नोंदणी अधिकाऱ्यांना नोटीस पाठवून मालमत्ता



ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले. तपासात असे दिसून आले आहे की, एजेएलच्या मालमत्ता सुमारे ९८८ कोटी रुपयांच्या आहेत, ज्या बेकायदेशीर मार्गांनी मिळवण्यात आल्या होत्या. नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र पूर्वी एजेएल द्वारे प्रकाशित केले जात होते. ही कंपनी स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झाली होती आणि दिल्ली, मुंबई आणि लखनौ सारख्या शहरांमध्ये तिच्या अनेक मालमत्ता होत्या. ईडीचा आरोप आहे की धरवङ ने -गङ ला फक्त ५० लाख रुपयांना खरेदी केले, तर त्यांची मालमत्ता २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. या व्यवहारात आर्थिक अनियमितता आणि फसवणूकीचे आरोप झाले आहेत. भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी २०१४ मध्ये दिल्ली न्यायालयात तक्रार दाखल केली होती.

# माजलगावात १८ तास अभ्यास अभियानाचे आयोजन

माजलगाव-(प्रतिनिधी) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात १८ तास अभ्यास अभियान राबविण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगात उत्सवात साजरी केली जाते.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देश उभारणीसह सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मौलिक योगदान आहे. ज्ञानाची प्रतीक म्हणूनही त्यांना ओळखले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची प्रेरणा घेण्यासाठी १८ तास अभ्यासाचे आयोजन सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्रांतीसुर्य सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात करण्यात आले आहे. या १८ तास अभियानाचे उद्घाटन एड. बी.आर. डक यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. के. सानप आहेत. यावेळी पत्रकार उमेश मोगरेकर, पत्रकार उमेश जेथलिया, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक मगर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या १८ तास अभियानात जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन उपप्राचार्य डॉ. एन. के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए कव्हळे, उपप्राचार्य प्रा प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, समन्वयक प्रा संजय बागुल, ग्रंथपाल दत्ता सोळंके यांनी केले आह

# पिंपळनेर भागात उष्णतेचा कहर; पारा ४१ अंशावर गेल्याने बाजारपेठांत शुकशुकाट

पिंपळनेर-प्रतिनिधी मागील दोन दिवसापासून पासून बीड तालुक्यातील पिंपळनेरसह ग्रामिण भागात कमाल व किमान तापमानात जोरदार वाढ होत असून, सोमवारी ४० अंशांवर असलेले तापमान मंगळवारी ही ४१ अंशांवर पोहोचले होते, तर बुधवारी ४२ पोहचले. त्यामुळे दुपारच्या वेळी रस्त्यावर वाहतूक तुरळक दिसून येत होती. सकाळी ११ ते दुपारी ४ वाजे पर्यंत पिंपळनेर शहरातील बाजारपेठेसह,वाडी वस्ती, गावो- गावी शुकशुकाट दिसून आला. या वर्षीच्या उन्हाळ्यातील हे उच्चांकी तापमान असून, उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक शीतपेय, फळांना पसंती देत आहेत. उन्हापासून बचाव होण्यासाठी डोक्याला पांढरा कपडा, छत्री किंवा झाडाची सावली शोधताना नागरिक दिसून येत आहेत. त्यातच दोन दिवसापासून सायंकाळच्या वेळेस अचानक ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने उकाडा वाढला आहे. गेल्या आठवड्यापासून सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा १० तास वीज, महाराष्ट्रात दरवर्षी विजेचे बील कमी होणार; मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई। प्रतिनिधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून आर्वी येथे बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज देण्याची घोषणा केली. तसेच, महाराष्ट्रात दरवर्षी विजेचे बिल कमी होणार आहे, इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांना दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र देशात पाहिलं राज्य ठरलं आहे, की ज्या राज्याने विजेचे बिल दर ५ वर्षांनी कमी करून दाखवले, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले. दरम्यान, या ठिकाणी आमदार-खासदारांनी ज्या वेगवेगळ्या मागण्या केल्या आहे, त्यासाठी एक बैठक घेऊन त्यावर निर्णय घेऊ, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मी पण वर्धा जिल्ह्याचा काही काळासाठी पालकमंत्री होतो, त्यामुळे इथे विशेष लक्ष आहे, असेही त्यांनी म्हटले. महाराष्ट्रात दरवर्षी विजेचे बिल कमी होणार आहे, इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांना दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र देशात पाहिलं राज्य ठरलं आहे, की ज्या राज्याने विजेचे बिल दर ५ वर्षांनी कमी करून दाखवले आहे, असे फडणवीस यांनी म्हटले.




लोअर वर्धा प्रकल्पावर पाचशे मेगा वॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारला जात आहे. वर्धा जिल्हा सौर उर्जेच्या बाबतीत पूर्णतः स्वयंपूर्ण होईल. तर, नेरी मिर्झापुर गावाला संपूर्ण सौर ऊर्जा देण्यात आली आहे, असे म्हणत फडणवीसांनी येथील गावकऱ्यांचे अभिनंदन केले. शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज देऊ अशी घोषणा केली होती, ८० टक्के महाराष्टात आता लवकरच दिवसा १० तास वीज उपलब्ध करून दिली जाईल. विहीर पुनर्भरण ही योजना जर हातात घेतली तर त्याचा फायदा होईल, विहिरींची पातळी वाढेल, आपण जर असाच उपसा करीत राहिलो तर आपलाही प्रदेश रेगिस्थान झाल्याशिवाय राहणार नाही, असा

# मोठी बातमी! दानवे, खैरेंमधील वाद विकोपाला? पक्षाच्या मेळाव्याला चंद्रकात खैरेंची दांडी

मोठी बातमी समोर येत आहे. लोकसभा निवडणुकीपासूनच शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मात्र आता अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे का? अशी चर्चा सुरू झाली आहे. त्याला कारण देखील तसंच आहे, चंद्रकांत खैरे यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्याला दांडी मारली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. दानवे यांच्यामुळे चंद्रकांत खैरे यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्याला येणं टाळलं, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्याला चंद्रकांत खैरे हे गैरहजर होते, त्यामुळे चर्चेला उधाण आलं आहे. यामुळे आता दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे का? अशी चर्चा सुरू झाली आहे.




दानवेंमुळेच चंद्रकांत खैरे यांनी या मेळाव्याला येणं टाळल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यामध्ये लोकसभा निवडणुकीपासूनच आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून चंद्रकांत खैरे यांना लोकासभेचं तिकीट देण्यात आलं, मात्र दानवे हे देखील लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छूक होते. तेव्हा पक्ष नेतृत्वाकडून दानवे यांची समजूत काढण्यात आली होती. खैरे यांना लोकसभेचं तिकीट देण्यात आलं होतं. मात्र लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर खैरे यांनी दानवेंवर आरोप केले होते. दरम्यान काही दिवसांपूर्वीच चंद्रकांत खैरे यांनी पुन्हा एकदा दानवेंवर निशाणा साधला होता. दानवे मला छत्रपती संभाजीनगरातील कोणत्याही कार्यक्रमाला बोलावत नाहीत, असं चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं होतं. ‘ मी सुरुवातीपासूनच शिवसेनेचा नेता आहे. मी इथे शिवसेना वाढवली आहे, ते आता आले आहेत, मात्र दानवे हे मला कोणत्याही कार्यक्रमाला बोलावत नाहीत, नियोजन करत नाहीत,’ असं चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं होतं. त्यानंतर आता चंद्रकांत खैरे हे मेळाव्याला उपस्थित नसल्यानं चर्चेला उधाण आलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com